विभागीय/जिल्हा/तालुका क्रीडा संकुल
बांधकाम योजना
अनुदान मर्यादेत वाढ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००९/(प्र.क्र.२५/०९)/क्रीयुसे-१,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : २१ मार्च,२००९.**

**वाचा** :- (१) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-राक्रीधो-२००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१, दिनांक २६ मार्च,२००३,
(२) संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक-जिक्रीसं/अनुदान/२००६/ १३/का.९, दिनांक १३.१.२००९.

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा धोरण,२००१ अंतर्गत राज्यात विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलाची उभारणी करण्याची योजना कार्यान्वित झाली असून, विभागीय क्रीडा संकुलासाठी रु.१६.०० कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी रु.४.०० कोटी व तालुका क्रीडा संकुलासाठी रु.२५.०० लाख इतकी रक्कम बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय शासनाच्या दिनांक २६.३.२००३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलासाठी निश्चित करण्यात आलेल्या अनुदान मर्यादेस सुमारे ६ वर्षाचा कालावधी झालेला आहे. त्यानंतरच्या कालावधीत क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी लागणा-या साहित्याच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे.

२. बहुतांशी क्रीडा संकुलांच्या बांधकामासाठी शासनाने जी अनुदान मर्यादा आखून दिलेली आहे त्या मर्यादेपेक्षा कितीतरी जास्त रक्कम सदर क्रीडा संकुल पूर्ण करण्यासाठी लागत आहे. याशिवाय दिनांक २६.३.२००३ च्या शासन निर्णयामध्ये पाणी पुरवठा, ड्रेनेज व्यवस्था, विद्युतीकरण, अंतर्गत रस्ते व संरक्षक भिंत या पायाभूत सुविधादर्शक बाबींचा समावेश करण्यात आलेला नव्हता त्याचाही अंतर्भाव क्रीडा संकुलात करण्याची आवश्यकता आहे. याशिवाय व्हॅट करप्रणाली लागू केल्यामुळे खर्चात वाढ होत आहे. राज्यातील संकुलाच्या उभारणीसाठी दिनांक २६ मार्च,२००३ च्या शासन निर्णयात नमूद बाबी विचारात घेऊन संबंधित संकुल समिती आराखडा तयार करते. त्यामध्ये सुसूत्रता असावी म्हणून सर्व संकुलांसाठी एक टाईप्ड प्लॅन करण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन होती. या सर्व बाबींचा विचार करता विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलाची सध्याची अनुदान मर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**: शा स न  नि र्ण य :** विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलाची अनुदान मर्यादा निश्चित करुन झालेला दीर्घ कालावधी बांधकाम साहित्य व बांधकाम दरामध्ये झालेली वाढ, नवीन व्हॅट प्रणाली तसेच टाईप्ड प्लॅननुसार संकुलामध्ये नव्याने अंतर्भूत करावयाच्या क्रीडा सुविधा याचा

दिनांक १८ फेब्रुवारी,२००९ च्या मंत्रिमंडळ बैठकीत सर्वंकष विचार करण्यात आला. मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलासाठी निश्चित केलेल्या अनुदान मर्यादेत पुढील अटींच्या अधीन राहून वाढ करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | संकुलाचा प्रकार | प्रचलित अनुदान (रु.लाखात) | प्रस्तावित अनुदान (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| १ | विभागीय क्रीडा संकुल | १६००.०० | २४००.०० |
| २ | जिल्हा क्रीडा संकुल | ४००.०० | ८००.०० |
| ३ | तालुका क्रीडा संकुल | २५.०० | १००.०० |

(१) सुधारित अनुदान मर्यादा विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलातील बांधकाम प्रगती पथावर असलेल्या वा अद्याप बांधकाम सुरु होणा-या संकुलांना पूर्णतः लागू करण्यात यावी. यापूर्वी काही प्रमाणात निधी दिला असल्यास उर्वरित निधी देण्यात यावा.

(२) प्रचलित योजनेनुसार पूर्ण अनुदान देऊन दिनांक २६ मार्च,२००३ च्या निर्णयातील प्रचलित सर्व सुविधांसह पूर्ण झालेल्या क्रीडा संकुलांना फक्त क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा / ड्रेनेज / विद्युतीकरण / अंतर्गत रस्ते व संरक्षक भिंत तसेच टाईप्ड प्लॅननुसार द्यावयाच्या नवीन क्रीडा सुविधा यासाठी अनुदान देण्यात यावे,

(३) बांधकाम साहित्य व अनुषंगिक सेवांच्या दरात वाढ झाल्यास संबंधित क्रीडा संकुल समित्यांनी सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास राज्य क्रीडा विकास समितीची मान्यता घ्यावी. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित डी.एस.आर. नुसार या संकुलांना वाढीव निधी, निधीची उपलब्धता व बांधकाम प्रगतीनुसार देण्यात यावा.

(४) क्रीडा व युवकसेवा संचालनालयाने प्रस्तावित केलेल्या (वाचा क्रमांक-२) नवीन टाईप्ड प्लॅनला शासनाची मान्यता देण्यात येत असून त्याची पूर्णतः अंमलबजावणी ही यापुढील काळात बांधकाम सुरु होणा-या क्रीडा संकुलासाठी करण्यात यावी,

(५) परिच्छेद-१ मधील सुधारित अनुदान मर्यादा मंत्रिमंडळ निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

२. तालुका, जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलातील प्रस्तावित दिनांक २६ मार्च,२००३ च्या शासन निर्णयानुसार घेतल्या जाणा-या सुविधा व त्यासाठी निश्चित निधीच्या सुधारित शासन निर्णयाचे अनुदान मर्यादेनुसार द्यावयाच्या सुविधा व निधी याचा तपशील परिशिष्ट-"अ", "ब" व "क" मध्ये दिला आहे.

३. तालुका, जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलासाठीच्या वाचा क्रमांक-२ येथे नमूद नवीन टाईप्ड प्लॅनची प्रत सर्व संकुल समित्यांनी क्रीडा व युवकसेवा संचालनालयाकडून प्राप्त करुन घ्यावी.

४. सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक-७०/०९१/व्यय-५, दिनांक ९.२.२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra.gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा **संगणक सांकेतांक क्रमांक-**२००९०३२११६०९२०००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सीमा य. उकार्डे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

(१) मा.राज्यपालांचे सचिव, मुंबई,
(२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
(३) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, / मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
(४) संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(७) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
(८) सर्व विभागीय आयुक्त (महसूल) तथा अध्यक्ष, विभागीय क्रीडा संकुल कार्यकारी समिती,
(९) सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समिती,
(१०) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
(११) सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल) तथा अध्यक्ष, तालुका क्रीडा समिती,
(१२) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी / तालुका क्रीडा अधिकारी,
(१३) महसूल व वन विभाग (कार्यासन-ज-१ ते ज-८) (एकूण ८ प्रती)
(१४) नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
(१५) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(१६) सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-३), मंत्रालय, मुंबई,
(१७) मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१८) मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१९) मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,
(२०) कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प शाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
(२१) निवड नस्ती (क्रीयुसे-१).

शासन निर्णय :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. राक्रीधो / २००९ /(२५/०९) / क्रीयुसे-१

विभागीय क्रीडा संकुल

**परिशिष्ट - 'अ'**

(रुपये लाखात)

| अ.क्र. | प्रचलित क्रीडा सुविधांचा तपशिल | प्रचलित नियमानुसार अनुदान मर्यादा | प्रस्तावित क्रीडा सुविधांचा तपशिल | अंदाजे खर्च | प्रस्तावित अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १ | **खुले प्रेक्षागृहे :-** १० लेनचा सिंथेटिक ट्रॅक,२०,००० प्रेक्षकांसाठी गॅलरी फ्लड लाईटसह, **पॅव्हेलियन व प्रशासकीय इमारत,** | ७००.०० | **खुले प्रेक्षागृहे:-** १० लेनचा ४०० मी. सिंथेटिक ट्रॅक,१०,००० प्रेक्षकांसाठी गॅलरी , (५००० आर.सी.सी. व ५००० **मातीचा भराव) पॅव्हेलियन व प्रशासकीय इमारत,** | ७५०.०० | ७५०.०० |
| २ | **बंदिस्त जलतरण तलाव :-** ५०X२१ मी. ऑलिंपिक साईज डायव्हिंग तलाव, फिल्टरेशन प्लँटसह, | २००.०० | **बंदिस्त जलतरण तलाव :-** ५०X२१ मी. ऑलिंपिक साईज डायव्हिंग तलाव, फिल्टरेशन प्लँटसह, डायव्हिंग तलाव २५ X २५X५ उंची फिल्टरेशन प्लँटसह. | ३२३.७५ | ३२३.७५ |
| ३ | **बंदिस्त प्रेक्षागृह :- (वातानुकुलीत)** ३६ X १२.५मी. आकाराचे वुडन /सिंथेटिक फलोअरींगसह | १५०.०० | **बंदिस्त प्रेक्षागृह :-** ५० X४० X ६८मी. आकाराचे वुडन /सिंथेटिक फलोअरींगसह ८०० क्षमतेची प्रेक्षक गॅलरी | ३०६.१५ | ३०६.१५ |
| ४ | **ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदान :-** | ३००.०० | **ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदान :-** १०१.४० X ६८.० मी. | ३२४.०० | ३२४.०० |
| ५ | **विविध खेळांची क्रीडांगणे :-** फुटबॉल, हॅन्डबॉल, कबड्डी, खोखो, बास्केटबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, सरावासाठी ४०० मी. सिंडर ट्रॅक | | **विविध खेळांची क्रीडांगणे :-** फुटबॉल, हॅन्डबॉल, कबड्डी, खोखो, बास्केटबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, सरावासाठी ४०० मी. सिंडर ट्रॅकसह | १५८.३० | १५८.३० |
| ६ | **आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासाहित्य :-** उ.दा. जिम्नॅस्टिकची सर्व उपकरणे, ॲथलेटिक्स इलेक्ट्रॉनिक्स स्टॉप वॉचेस, स्विमींग इलेक्ट्रॉनिस्क टचपॅड, बास्केटबॉल हॅड्रोलिक अपराईट बोर्ड, कुस्ती, ज्युडो, कराटे व जिम्नॅस्टिक्स मॅटस् इ. | १००.०० | **आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासाहित्य :-** उ.दा. जिम्नॅस्टिकची सर्व उपकरणे, ॲथलेटिक्स इलेक्ट्रॉनिक्स स्टॉप वॉचेस, स्विमींग इलेक्ट्रॉनिस्क टचपॅड, बास्केटबॉल हॅड्रोलिक अपराईट बोर्ड, कुस्ती,कब्बड्डी , ज्युडो, कराटे व जिम्नॅस्टिक्स मॅटस् इ. व समितीस आवश्यक वाटणारे टिकाऊ इतर क्रीडा साहित्य | १५०.०० | १५०.०० |
| ७ | मुला-मुलींचे वसतिगृह | -- | मुला-मुलींचे वसतिगृह | १००.०० | १००.०० |
| ८ | **अ.** क्रीडा संकुलातील पाणीपुरवठा व्यवस्था | -- | **अ.** क्रीडा संकुलातील पाणीपुरवठा व्यवस्था | २५.०० | २५.०० |
| ९ | **ब.** क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | -- | **ब.** क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | २५.०० | २५.०० |
| १० | **क.** क्रीडा संकुलाचे विद्युतीकरण | -- | **क.** क्रीडा संकुलाचे विद्युतीकरण | २५.०० | २५.०० |
| ११ | **ड.** क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | -- | **ड.** क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | २५.०० | २५.०० |
| १२ | **इ.** क्रीडा संकुलातील संरक्षक भिंत | -- | **इ.** क्रीडा संकुलातील संरक्षक भिंत | १३७.८० | १३७.८० |
| १३ | **प.** इतर खर्च | -- | **प.** इतर खर्च | ५०.०० | ५०.०० |
| | **एकुण रुपये :** | **१६००.००** | | **२४००.००** | **२४००.००** |

टिप
१. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निवासस्थान, कार्यालये, विश्रामगृह, महत्वाच्या व्यक्तींसाठी विश्रामगृह (V.I.P. Longe) इ. बांधकामाचा समावेश वरील एकुण बांधकामामध्ये करण्यांत यावा
२. उपरोक्त बाबींच्या सर्वसाधारण खर्चाच्या रकमा दर्शविण्यांत आल्या आहेत सदर सुविधा व खर्च निर्देशित स्वरुपांचा (indicative)असून त्यामध्ये स्थळपरत्वे बदल करता येईल.
३. एका बाबीवरील शिल्लक निधी, अनुदान मर्यादेत दुसऱ्या बाबीवर खर्च करता येईल.

**<u>शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक-राक्रीधो-२००९/(प्र.क्र.२५/०९)/क्रीयुसे-१ चे सहपत्र</u>**

**<u>जिल्हा क्रीडा संकुल</u>**

**: <u>प रि शि ष्ट-"ब"</u> :**

(रुपये लाखात)

| अ.क्र. | प्रचलित क्रीडा सुविधांचा तपशील | प्रचलित नियमानुसार अनुदान मर्यादा | प्रस्तावित क्रीडा सुविधांचा तपशील | अंदाजे खर्च | प्रस्तावित अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **<u>खुले प्रेक्षागृह</u>** :- ४०० मी.धावनपथ, ५००० प्रेक्षकांसाठी गॅलरी, हॉकी/फूटबॉल मैदान, चेंजिंग रुम, क्रीडा साहित्यासाठी जागा | ७०.०० | **<u>खुले प्रेक्षागृह</u>** :- ४०० मी.धावनपथ (माती), ५००० प्रेक्षकांसाठी गॅलरी, (२००० RCC व ३००० मातीचा भराव) हॉकी/फूटबॉल मैदान, चेंजिंग रुम, क्रीडा साहित्यासाठी जागा | १०५.०० | १०५.०० |
| २ | **<u>विविध खेळांची क्रीडांगणे</u>** :- व्हॉलीबॉल, बास्केटबॉलची मैदाने, कबड्डी/ खो खो ची २ मैदाने, लॉन टेनिस व लोकप्रिय असलेल्या खेळांची अन्य मैदाने | १०.०० | **<u>विविध खेळांची क्रीडांगणे</u>** :- व्हॉलीबॉल, बास्केटबॉलची मैदाने, कबड्डी/खो खो ची २ मैदाने, लॉन टेनिस व लोकप्रिय असलेल्या खेळांची अन्य मैदाने | ३४.०० | ३४.०० |
| ३ | मल्टिजिम, वेटलिफ्टिंग, फिजिकल एक्सरसाईज हॉल, फिटनेस सेंटर | १०.०० | मल्टिजिम, वेटलिफ्टिंग, फिजिकल एक्सरसाईज हॉल, फिटनेस सेंटर | २७.०० | २७.०० |
| ४ | **<u>जलतरण तलाव</u>** :- ८ लेन्ससह २५ x२१ मीटर डायव्हिंगसह किंवा शिवाय परंतु फिल्टरेशन प्लँटसह | ८०.०० | **<u>जलतरण तलाव</u>** :- ८ लेन्ससह २५ x२१ मीटर फिल्टरेशन प्लँटसह व चेंजिंग रुमसह | ११२.०० | ११२.०० |
| ५ | **<u>इनडोअर हॉल</u>** :- (मल्टिपरपज गेम हॉल) सागवान लाकडाचे फ्लोअरिंग/सिर्थेटिक फ्लोअरिंग/आर्टिफिशियल फ्लोअरिंग/लॉन टेनिस सिर्थेटिक फ्लोअरिंग व हार्ड कोर्ट | १२०.०० | **<u>इनडोअर हॉल</u>** :- (मल्टिपरपज गेम हॉल) सागवान लाकडाचे फ्लोअरिंग/सिर्थेटिक फ्लोअरिंग/आर्टिफिशियल फ्लोअरिंग/लॉन टेनिस सिर्थेटिक फ्लोअरिंग व हार्ड कोर्ट, शूटिंग रेंज | १७७.०० | १७७.०० |
| ६ | ८० बेडचे वसतीगृह यामध्ये ३० बेड मुलींसाठी आवश्यक. शक्यतो डॉरमेटरी टाईप असावे | ६०.०० | मुला मुलींचे वसतीगृह यामध्ये ३० बेड मुलींसाठी आवश्यक. शक्यतो डॉरमेटरी टाईप असावे | ९०.०० | ९०.०० |
| ७ | खेळाचे साहित्य | ५०.०० | खेळाचे साहित्य | ७५.०० | ७५.०० |
| ८ | (अ) क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | -- | (अ) क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | १५.०० | १५.०० |
| ९ | (ब) क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | -- | (ब) क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | १५.०० | १५.०० |
| १० | (क) क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | -- | (क) क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | २०.०० | २०.०० |
| ११ | (ड)क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | | (ड)क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | १५.०० | १५.०० |
| १२ | (ड) क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | -- | (ड) क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | ८५.०० | ९०.०० |
| १३ | (प) इतर खर्च | -- | (प) इतर खर्च | २५.०० | २५.०० |
| | एकूण : | ४००.०० | एकूण : | ८००.०० | ८००.०० |

<u>टीप</u> :-(१) जिल्हा क्रीडा अधिकारी व कर्मचा-यांचे निवासस्थान, कार्यालय, विश्रामगृह, महत्त्वाच्या व्यक्तींसाठी विश्रामगृह (V.I.P. Longe) इ.बांधकामाचा समावेश वरील एकूण बांधकामामध्ये करण्यात यावा,

(२) उपरोक्त बाबींच्या सर्वसाधारण खर्चाच्या रकमा दर्शविण्यात आल्या आहेत. सदर सुविधा व खर्च निर्देशित स्वरुपाचा (indicative) असून त्यामध्ये स्थळपरत्वे बदल करता येईल.

(३) एका बाबीवरील शिल्लक निधी, अनुदान मर्यादेत दुस-या बाबीवर खर्च करता येईल.

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक-राक्रीधो-२००९/(प्र.क्र.२५/०९)/क्रीयुसे-१ चे सहपत्र

## तालुका क्रीडा संकुल

## : परिशिष्ट-"क" :

(रुपये लाखात)

| अ.क्र. | क्रीडा सुविधा | प्रचलित नियमानुसार अनुदान मर्यादा | प्रस्तावित क्रीडा सुविधांचा तपशील | अंदाजे खर्च | प्रस्तावित अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०० मी.धावनपथ | ४.०० | ४०० मी.धावनपथ | २०.०० | २०.०० |
| २ | २ बॅडमिंटन कोर्टसह इनडोअर गेम हॉल | १२.५० | इनडोअर गेम हॉल | ४०.०० | ४०.०० |
| ३ | (अ) खो खो, व्हॉलीबॉल, कबड्डीची प्रत्येकी २ मैदाने | १.८० | (अ) खो खो, व्हॉलीबॉल, कबड्डीची प्रत्येकी २ मैदाने | ५.०० | ५.०० |
| | (ब) बास्केटबॉल कोर्ट/ लॉन टेनिस वा अन्य सुविधा/शूटींग रेंज | २.२० | (ब) बास्केटबॉल कोर्ट/ लॉन टेनिस वा अन्य सुविधा/शूटींग रेंज | ५.०० | ५.०० |
| ४ | बोअरवेल, इलेक्ट्रीक मोटारसह | ०.५० | कार्यालयीन इमारत | ५.०० | ५.०० |
| ५ | क्रीडा संकुलाला संरक्षक भिंत / कुंपण | -- | क्रीडा साहित्य | ५.०० | ५.०० |
| ६ | क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | -- | क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | २.०० | २.०० |
| ७ | क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | -- | क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | १.०० | १.०० |
| ८ | सुपरव्हिजन | ०.५० | क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | २.०० | २.०० |
| ९ | इलेक्ट्रिफिकेशन | ०.५० | क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | १.०० | १.०० |
| १० | क्रीडा साहित्य | १.५० | क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | १०.०० | १०.०० |
| ११ | कार्यालयीन साहित्य व संगणक (पूर्ण संच) | १.०० | इतर किरकोळ खर्च | ४.०० | ४.०० |
| १२ | इतर किरकोळ खर्च | ०.५० | | | |
| | एकूण : | २५.०० | एकूण : | १००.०० | १००.०० |

टीप :- (१) अधिकारी/कर्मचारी निवासस्थान, कार्यालय, विश्रामगृह, इ.बांधकामाचा समावेश वरील एकूण बांधकामामध्ये करण्यात यावा,

(२) उपरोक्त बाबींच्या सर्वसाधारण खर्चाच्या रकमा दर्शविण्यात आल्या आहेत. सदर सुविधा व खर्च निर्देशित स्वरुपाचा (indicative) असून त्यामध्ये स्थळपरत्वे बदल करता येईल.

(३) एका बाबीवरील शिल्लक निधी अनुदान मर्यादेत दुस-या बाबीवर खर्च करता येईल.